पुणे जिल्हा परिषद, पुणे
प्रशासकीय इमारत भवन,
(प्राथमिक) – ९९१०८

क्रमांक विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान/तत्वावर~~

जावक क्र. प्राशि-३/प्रशासन/मा/ १४/२००८ ७९४-८८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक 14 JAN 2008

प्रति

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

२. शिक्षण ~~प्रमुख~~/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ.

विषय : सन २००४- २००५ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत. (माध्यम इंग्रजी)

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/ १००४/ (२६० / ०४ )/प्राशि-३, दिनांक २२ जुन २००४

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनार्थ घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००४ पासून इ. १ ली च्या वर्गास ------ फक्त सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षात ~~प्रथम/पुन:/अतिरिक्त/वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर/स्वतंत्रपणे देण्यात येते/ आहे.~~ ~~मराठी~~ इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| | २. | ३. | ४. | ५. |
| १] | चैतन्य विद्या प्रतिष्ठान कर्वेनगर पुणे-९ कायम विना अनुदान | बावधन बु।। ता-मुळशी | इ. १ ली च्या वर्गात फक्त | इंग्रजी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सोयी...

PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner

ता.मुळशी पुणे

कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./ 6408
/ छा.प्रा.शा./ दि. 7/3/2008

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
पेरीविंकल इंग्लीश मिडीयम स्कूल,
बावधन, ता. मुळशी

विषय :- कायम विना-अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्राथम /जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (२०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक २४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या ~~जादा~~ / नैसर्गिक ~~वाढीच्या~~ / वाढीच्या प्रथम/ जादा तुकड्या / वर्ग जून २००६ पासून सन २००७ - २००८, या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | पेरीविंकल इंग्लीश मिडीयम स्कूल, बावधन | इंग्रजी | इ. १ ली ते ४ थी | नैसर्गिक | मंजूर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष, चैतन्य विद्या प्रतिष्ठान, पुणे २९

For.
PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner

कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/खा.प्रा.शा./८०/ दि.१/१०/०८/२१०
ता. १/१०/२००८

प्रति
मुख्याध्यापक./मुख्याध्यापिका.
पेरिविंकल इंग्लीश
मिडियम स्कूल, बावधन ता० मुळशी

विषय :- कायम-विना-अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम /जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (२०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक २४ मार्च २००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्याच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकड्या / वर्ग जून २००८ पासून सन २००८ - २००९ . या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | संख्या मंजूर |
|---|---|---|---|---|---|
| १) | पेरिविंकल इंग्लीश मिडियम स्कूल, बावधन | इंग्रजी | ५ वी | नैसर्गिक | |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक संख्येने कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.

२. सदर शाळेने तुकड्यासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.

३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.

५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडींमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.

७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी. (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद.पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष , चैतन्य विद्या प्रतिष्ठान ,पुणे

for [signature]
PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner

कायम विना अनुदान तत्वावर (इंग्रजी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/
/का.प्रा.शा./८०/ दि. २/१०/०

प्रति,
मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
पेरीविंकल इंग्लिश मिडीयम
स्कूल, बावधन ता. मुळशी

विषय :- कायम विना अनुदान तत्वावर शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना
नवीन/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम / जादा तुकड्या/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.
संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-पीएसएस-१००१/(२०००/०१) प्रा.शि.-१ दिनांक १४ मार्च २००१.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या आवश्यकतेनुसार दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढीचा / वाढीच्या प्रथम/ जादा तुकड्या / वर्ग सन २००६ पासून सन २००६ - २०१० या शैक्षणिक वर्षांकरिता खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १) | पेरीविंकल इंग्लिश मिडीयम स्कूल | इंग्रजी | इ. ६ वी | ५ नैसर्गिक | मंजूर |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक तेवढा कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडीवाढीसाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करून घेतल्या पाहिजेत.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणाऱ्या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी, (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे करिता

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष
चैतन्य विद्या प्रतिष्ठान, मुळशी

For
PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner

कायम विना अनुदान तत्वावर
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू, तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/ [illegible] /२०१४
पुणे १ दिनांक:- [illegible]/११/२०१४

प्रति,
मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
चैतन्य विद्या प्रतिष्ठान संचलित,
पेरिविंकल मेडीयम स्कुल, बावधन बु. ता. मुळशी जि. पुणे.

विषय:- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा वाढीव्या प्रथम/जादा तुकडया/ अतिरिक्त तुकडी वाढ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **नैसर्गिक** /अतिरीक्त वाढीचा /जादा तुकडया /वर्ग **सन** २०१४ -२०१५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी क्रमांक | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चैतन्य विद्या प्रतिष्ठान संचलित, पेरिविंकल मेडीयम स्कुल, बावधन बु. ता. मुळशी जि. पुणे. | इंग्रजी | इयत्ता ७ वी | १ ली तुकडी | नैसर्गिक तुकडी वाढ | **कायम विना अनुदान तत्वावर मंजूर** |

<u>अटी व शर्ती</u>

१) शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२) सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३) सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४) शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५) सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६) सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७) तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८) पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

For PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**१. सचिव / अध्यक्ष** चैतन्य विद्या प्रतिष्ठान संचलित,
**२. मुख्याध्यापक :-** पेरिविंकल मेडीयम स्कुल बावधन बु. ता. मुळशी जि. पुणे

Scanned with CamScanner

शिक्षण उपसंचालक पुणे विभाग
पुणे ४ यांचे कार्यालय
09 OCT 2017
23609
आवक नोंदणी क्रमांक

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : एसएफएस-२०१७/प्र.क्रमांक ४१६/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
दिनांक : २९ ऑगस्ट, २०१७

प्रस्तावना –

१. चैतन्य विद्या प्रतिष्ठान बावधन बु. ता. मुळशी जि. पुणे संचालित पेरिविंकल इंग्लिश मिडीयम स्कुल, बावधान ता. मुळशी जि. पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय –

२. २.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२. (सन २०१३ चा ०१) अंतर्गत चैतन्य विद्या प्रतिष्ठान बावधन बु. ता. मुळशी जि. पुणे संचालित पेरिविंकल इंग्लिश मिडीयम स्कुल बावधान ता. मुळशी जि. पुणे (प्राथमिक ते माध्यमिक, इ. ८ वी ते १० वी, राज्यमंडळ, इंग्रजी माध्यम) ही नवीन शाळा सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर सुरू करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीनशाळा /दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | चैतन्य विद्या प्रतिष्ठान बावधान बु. ता. मुळशी जि. पुणे | पेरिविंकल इंग्लिश मिडीयम स्कुल बावधान ता. मुळशी जि. पुणे | दर्जावाढ | ८ वी ते १० वी राज्यमंडळ | इंग्रजी |

२.२. अटी व शर्ती :–

१. सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदींचा व या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात येणाऱ्या सर्व नियमांची/तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

For PRINCIPAL
Periwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner

संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पूर्तता करून सन २०१७–१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरू करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापणाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७–१८ करीता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करून या शासन निणर्याच्या दिनांकापासून अठरा महिन्यांच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

३. परवानगी देण्यात आलेल्या नववी शाळा १) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे व कार्यपद्धतीचे तसेच, २) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन अधिनियम, २०१२ ( सन २०१३ वर ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.)

४. संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना अधिनियम, २००९ मधील तरतुदीची पूतर्ता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरू केल्यास शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

६. यु – डायस :– या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा /दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unifled District information system for Education) 'स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त शाळा' म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करून यु –डायस कमांक प्राप्त करून घेण्याबाबची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्या प्रमाणे संस्थेने, सर्व संबंधिताच्या माहितीकरिता 'स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/अर्जवाढ परवानगी प्राप्त शाळा' असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

७. परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळवण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा. मा. नानल
(स्वा. म. नानल)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

१. आयुक्त (शिक्षण,) महाराष्ट्र राज्य पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे
... (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
... पुणे

For. [signature]
PRINCIPAL
Perlwinkle English Medium School
Bavdhan (bk) Pune-21

Scanned with CamScanner